प्रति,

जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर.

**विषय- प्राणी क्लेश प्रतिबंधक सोसायटी अंतर्गत अशासकीय सदस्य निवडणेसाठी अर्ज मागविणेबाबत नोटीस . . .**

संदर्भ- शासन अधिसूचना क्र.पविआ-२०१४/प्र.क्र.४१४/पदुम-३, दि.१४ मार्च २०१७

जावक क्रमांक- जिपउको/तांत्रिक/प्राणीक्लेश/ २२६३ /२०१८. कोल्हापूर दिनांक २१/६/२०१८

वरील विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, संदर्भीय अधिसूचनेनुसार कोल्हापूर जिल्हयात जिल्हास्तरीय प्राणी क्लेश प्रतिबंधक सोसायटी स्थापन करावयाची आहे. सदर समितीमध्ये खालीलप्रमाणे पदसिध्द सदस्य आहेत-

**अ) पदसिध्द सदस्य-**

| | |
|---|---|
| १. जिल्हाधिकारी | - अध्यक्ष. |
| २. जिल्हा पोलीस अधिक्षक | - सदस्य. |
| ३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | - सदस्य. |
| ४. आयुक्त, सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका यांनी नामनिर्देशित केलेले अधिकारी | - सदस्य. |
| ५. प्रादेशिक परिवहन अधिकारी | - सदस्य. |
| ६. जिल्हा वन अधिकारी | - सदस्य. |
| ७. जिल्हा शिक्षण अधिकारी | - सदस्य. |
| ८. जिल्हा माहिती व जनसंपर्क अधिकारी | - सदस्य. |
| ९. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त | - सदस्य सचिव. |

तसेच संदर्भीय अधिसूचनेनुसार सदर समितीमध्ये खालीलप्रमाणे अशासकीय सदस्य नियुक्त करावयाचे आहेत-

**ब) अशासकीय सदस्य-**

| | |
|---|---|
| १०. जिल्हयातील गोशाळा/ पांजरापोळ संस्थांपैकी एका संस्थेचा अध्यक्ष | - सदस्य. |
| ११. प्राणी कल्याणविषयक कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्थेचे दोन सदस्य | - सदस्य. |
| १२. सर्वसाधारण समितीने नामनिर्देशित केलेल्या २ व्यक्ती | - सदस्य. |
| १३. जिल्हयातील मानवहितकारक कार्य करणारे / प्राण्यावर प्रेम करणारे / प्राणी कल्याणासाठी काम करणारे पाच ते सहा कार्यकर्ते- | - सदस्य. |

जिल्हयामध्ये प्राणी कल्याणाचे काम करणेसाठी वरीलप्रमाणे अशासकीय सदस्यांची नेमणूक करावयाची आहे. त्यासाठी मानवहितकारक कार्य करणारे / प्राण्यावर प्रेम करणारे / प्राणी कल्याणासाठी काम करणारे यांचेकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सदरचे अर्ज या कार्यालयाच्या पत्त्यावर दि.२/७/२०१८ अखेर पोस्टाने अथवा समक्ष येऊन कार्यालयीन वेळेत सादर करावेत. अर्जाचा नमुना सोबत जोडला आहे.

सोबत : अर्जाचा नमुना.

**जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त**
**कोल्हापूर.**
**तथा सदस्य सचिव**
**प्राणी क्लेश प्रतिबंधक सोसायटी, कोल्हापूर.**

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सविनय सादर-